प्रकरण - १

# संशोधनाची पार्श्वभूमी

१.० संशोधनाची पार्श्वभूमी

१.१ राष्ट्रीय अभ्यासक्रमातील दहा गाभाभूत घटक

१.२ शालेय स्तरावर भूगोल विषयाचे स्थान

१.३ भूगोल विषयाचे महत्त्व

१.४ समस्या विधान

१.५ पारिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या

१.६ संशोधनाची उद्दिष्टे

१.७ संशोधनाची गरज

१.८ संशोधनाचे महत्त्व

१.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१.१० संशोधनाची कार्यपद्धती

१.११ प्रकरणीकरण

# प्रकरण - १

# संशोधनाची पार्श्वभूमी

## १.० संशोधनाची पार्श्वभूमी

आज एकविसाव्या शतकात वावरत असताना आपल्यापुढे एका एकात्म, सर्वधर्मसमभावी, लोकशाही, समाजवादी अशा भारतीय समाजाचे स्वप्न साकार करण्यासाठी केंद्र शासनाने नवे शैक्षणिक धोरण तयार केले. शिक्षण ही आजची आणि उद्याची एकमेवाद्वितीय अशी गुंतवणूक आहे, हे प्रमुख तत्त्व म्हणजे शिक्षणविषयक धोरणाची गुरूकिल्ली आहे असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या 'शैक्षणिक आव्हानाकडून कृतिकार्यक्रमाकडे' या ग्रंथात नमूद करण्यात आले आहे. या कार्यात शिक्षणतज्ज्ञ व सर्वसामान्य जनता यांच्या विचारांचा व अपेक्षांचा विचार करण्यात आलेला आहे. आजच्या भारतीय समजाचे चित्र किंवा स्वरूप कसे आहे आणि भविष्यकाळातील भारतीय समाज कसा असायला पाहिजे या दोन बाबींचा प्रामुख्याने विचार केला आहे.

शिक्षणात समाजाचा सहभाग गरजेचा आहे. त्याचबरोबर दहा गाभाघटकही शिक्षणातून विद्यार्थ्यांपर्यंत रूजले पाहिजेत तरच भाषा-धर्म-जाती, पंथ अशा अनेकांगांनी बहरलेल्या या देशात राष्ट्रीय एकात्मता आणि सर्व धर्मांप्रति आदर प्रत्येकाच्या मनात निर्माण होईल. स्त्री-पुरूष, गरीब-श्रीमंत, कनिष्ठ-वरिष्ठ असा कोणताही भेदभाव न मानणारा समाज शिक्षणातून निर्माण व्हावा. भारतीय संस्कृती प्राचीन आहे. त्याचप्रमाणे ती संपन्नही आहे. या प्राचीन व संपन्न संस्कृतीचा वारसा आपण जपला पाहिजे.

भारत हा देश अनेक घटक राज्यांचा मिळून बनलेला आहे. गाभाभूत घटक ही संकल्पना विविधतेतील एकता जपण्याच्या गरजेतून तयार झाली. प्रत्येक राज्य आपला अभ्यासक्रम ठरवते. त्या राज्याच्या गरजा लक्षात घेऊन तेथील अभ्यासक्रमाची रूपरेषा ठरते. प्रत्येक राज्याच्या गरजा जरी

वेगवेगळ्या असल्या, तरी प्राथमिक शालेय अभ्यासक्रम ठरविताना संपूर्ण देशाच्या गरजा लक्षात घ्याव्या लागतात. त्या गरजा ठरविताना विविधतेवर नव्हे तर एकात्मतेवर भर द्यावा लागतो.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या अनुषंगाने भारतीय संविधानानुसार राष्ट्रीय एकात्मता व मूल्यांची जोपासना यावर भर देण्यात आला. त्यासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम हे प्रभावी माध्यम म्हणून वापर करण्याचे योजिले. राष्ट्रीय अभ्यासक्रम सर्व राज्यांसाठी एकच असला तरीही आपल्या सांस्कृतिक, भौगोलिक व ऐतिहासिक वैशिष्ट्यांनुसार बदल करण्याचे स्वातंत्र्य राज्यांना देण्यात आलेले आहे. परंतु दहा गाभाभूत घटकांचा अभ्यासक्रमात समावेश करण्याचे प्रत्येक राज्यावर बंधन घालण्यात आले आहे.

## १.१ राष्ट्रीय अभ्यासक्रमातील दहा गाभाभूत घटक

### १. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा गाभाघटक इतिहासाच्या अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा भाग आहे. इतिहास हा विषय शालेय स्तरावर शिकविताना भारताचा सांस्कृतिक वारसा व भारताचा स्वातंत्र्यलढा हे महत्त्वाचे भाग व त्यांचे यथार्थ ज्ञान होणे आवश्यक आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांना समकालीन भारतीय स्थिती व भारताच्या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेशी संबधित असणारी मुलभूत मूल्येही समजतात.

### २. भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या

या गाभाघटकात भारतीय संविधानाचा समावेश होतो. सुजाण नागरिक बनण्याच्या दृष्टीने हा आशय उपयुक्त आहे. यामध्ये नागरिकाची मूलभूत कर्तव्ये व अधिकार, त्यावरील संविधानात्मक बंधने, शासनावरील घटनात्मक बंधने व संविधानात्मक जबाबदाऱ्या इत्यादी बाबींचा समावेश आहे. नागरिकशास्त्र या विषयात या गाभाघटकासंबंधीच्या माहितीचा समावेश आहे.

### ३. राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय

राष्ट्रीय अस्मिता हे राष्ट्रीय एकात्मतेचे आवश्यक अंग आहे. या गाभाघटकामध्ये राष्ट्रीय प्रतिके, राष्ट्रीय सण, राष्ट्रीय फूल, पक्षी व प्राणी, भारतातील पर्वत, नद्या, धरणे व जमीन, भारतातील वास्तुशिल्पे, नृत्य व संगीत आणि आधुनिक व वैज्ञानिक तीर्थस्थाने यांचा समावेश होतो. राष्ट्राचो ही श्रद्धास्थाने आहेत. त्यांचा योग्य तो मान राखणे तसेच त्याचे पावित्र्य राखणे ही जाणीव या घटकाच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी ही अपेक्षा आहे. राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण होण्याच्या दृष्टीने व राष्ट्राचा खरा नागरिक बनण्याच्या दृष्टीने या बाबी महत्त्वाच्या आहेत.

### ४. भारताचा सामायिक सांस्कृतिक वारसा

यामध्ये संस्कृती या घटकाचा समावेश होतो. संस्कृती म्हणजे समाजाने प्राचीन काळापासून आजतागायत प्राप्त केलेले ज्ञान, विचारधन, धर्म, उपासना, पंथ, भाषा व साहित्य, कला, संगीत, नृत्य, परंपरा, चालीरीती, जीवनपद्धती, मूल्ये व आर्थिक-सामाजिक, व्यावसायिक वैशिष्ट्ये होय. प्राचीन भारतीय संस्कृती व भिन्नतेत असणारी सांस्कृतिक समानता यांची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्याची आवश्यकता स्पष्ट केली आहे.

### ५. समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता

समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता या तिन्ही संज्ञांचे या गाभाघटकात विस्तृत स्पष्टीकरण देण्यात आले आहे. समानता व लोकशाहीचा अर्थ व प्रकार, लोकशाहीची पायाभूत तत्वे, लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आवश्यक परिस्थिती, धर्मनिरपेक्षता अर्थ व धर्मनिरपेक्षतेची लोकशाहीच्या यशस्वितेसाठी असणारी गरज, राजकीय पक्षांनी पाळावयाची पथ्ये या गोष्टींचे विवेचन यात केलेले आहे.

## ६. स्त्री-पुरूष समानता

स्त्री-पुरूष विषमता ही आजची एक समस्या आहे. भारतीय समाजातील स्त्री-पुरूष गुणोत्तर, समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान, स्त्रीविषयी समाजिक संकेत, समाजाची स्त्रीविषयक अनास्था, वारसा हक्क व समानता, संपत्तीसाठी स्त्रियांचा छळ, भारतीय राज्यघटनेतील स्त्रियांचे स्थान, जागृत स्त्रीचे निकष, स्त्री-पुरूष समानतेचा चुकीचा अर्थ इत्यादी घटकांचा समावेश होतो. स्त्री-पुरूष समानता हे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे हे शालेय शिक्षणाचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

## ७. पर्यावरण संरक्षण

परिसर अभ्यास व विज्ञान हे विषय पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहेत. आपला परिसर, जमीन, हवा, पाणी, नद्या, वनस्पती या गोष्टी म्हणजे पर्यावरण. मानवाच्या वैज्ञानिक व तंत्रशास्त्रीय प्रगतीमुळे पर्यावरणाचा नैसर्गीक समतोल बिघडला आहे. प्रदूषण वाढत चालले आहे. अनेक नवे प्रश्न निर्माण झालेले आहेत. पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण व्हावी या दृष्टीने या गाभाघटकाची योजना आहे.

## ८. सामाजिक अडसरांचे निर्मुलन

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपणास विकासासाटी एकसंघ, एकात्म, एकजीवी समाजाची गरज आहे. या आदर्श समाजाच्या निर्मितीमध्ये अनेक अडथळे वा अडसर आहे. उदा. जातिव्यवस्था, धर्मांधता, स्त्री-पुरूष भेद, अनिष्ट प्रथा, रूढी व परंपरा, प्रादेशिक वाद, भाषावाद, सीमावाद, आर्थिक विषमता, निरक्षरता, आदर्श समाज निर्मितीमधील या अडथळ्यांची जाणीव करून देणे व ते अडथळे दूर करण्याच्या दृष्टीने मनोभूमिका तयार करणे आवश्यक आहे.

## ९. लहान कुटुंबाचा आदर्श

वाढती लोकसंख्या ही भारतातील सर्व समस्यांचे मूळ कारण आहे. समस्येने आज तीव्र स्वरूप धारण केलेले आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जीवनमानाच्या दर्जातही अपेक्षित वाढ होऊ शकलेली नाही. तेव्हा लोकसंख्या वाढ, राहणीमानाचा दर्जा, उत्पादनक्षमता, लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम, लहान कुटुंबाचे फायदे या गोष्टी मुलांना समजावून देणे गरजेचे आहे.

## १०. वैज्ञानिक मनोवृत्तीची रूजवणूक

एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी आजच्या पिढीला नवनवीन ज्ञान व तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. वैज्ञानिक मनोभाव या संकल्पनेत वैज्ञानिक विचारप्रक्रियेची शिस्त, त्यावरील दृढ विश्वास, निरंतर जिज्ञासा व त्यातून निर्माण होणारी प्रत्यक्ष कृती या सर्वांचा समावेश होतो. या गाभाघटकामध्ये उद्यासाठी विज्ञान शिक्षण, विज्ञानाचा एकात्मिक अभ्यास, वैज्ञानिक विचारपद्धती, विज्ञानाची गृहितके आणि वैज्ञानिक मनोवृत्ती रूजविण्याचे विविध उपक्रम यांचा समावेश होतो.

वरील दहा गाभाभूत घटक राष्ट्रीय अभ्यासक्रमात म्हणजेच नवीन अभ्यासक्रमात एकत्र नसून सर्वत्र विखुरलेले आढळतात. हे अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांत, अभ्यासक्रमाच्या आशयात तसेच पाठ्यपुस्तकातही आढळून येतात. गाभाघटकाच्या उपयोगाने आपली कर्तव्ये व अधिकार, स्त्री-पुरूष समानता, वृक्ष संवर्धन यांचे अध्यापन अधिकच डोळसपणे, अधिक विचारपूर्वक व हेतूपुरस्पर होईल. त्यासाठी नियोजनपूर्वक व हेतूपुरस्पर अध्यापन करावे. त्यामुळे उद्दिष्टांची पूर्तता होऊन मूल्यमापन करता येते व मूल्यमापनामध्ये काही त्रुटी आढळल्या तरी त्या प्रत्याभरणाने दुरूस्त करता येतात.

## १.२ शालेय स्तरावर भूगोल विषयाचे स्थान

इयत्ता पहिली व दुसरी या वर्गांना भूगोल हा स्वतंत्र विषय नसून त्यांचा अंतर्भाव परिसर अभ्यास यामध्ये केला आहे. इयत्ता तिसरी ते सातवी या इयत्तांना भूगोल विषय स्वतंत्र असला तरी तो सामाजिक अभ्यास या व्यापक विषयाचा भाग आहे. भूगोल, इतिहास व नागरिकशास्त्र यांच्या सोबत शिकवला जातो. माध्यमिक शिक्षणाच्या नवीन अभ्यासक्रमानुसार भूगोलाचा अंतर्भाव सामाजिक शास्त्रे यात केला आहे. उच्च माध्यमिक स्तरावर भूगोल विषय स्वतंत्र शंभर गुणांचा कला, वाणिज्य व शास्त्र शाखांमध्ये शिकविला जातो. उच्च माध्यमिक स्तरानंतर मात्र भूगोल विषय हा स्वतंत्र स्वरूपात पदवी व पतव्युत्तर विभागात समाविष्ट करण्यात आलेला आहे.

## १.३ भूगोल विषयाचे महत्त्व

भूगोल हा भौतिक व सामाजिक शास्त्रांना जोडणारा व्यापक व महत्त्वाचा विषय आहे. या विषयात विद्यार्थी निरनिराळया नैसर्गिक विभागातील पर्यावरण, मानवी जीवन, त्यांच्या समस्यांचा अभ्यास करतो तसेच भिन्न नैसर्गिक विभागातील भिन्नतेमुळे निर्माण होणारे मानवी जीवन तसेच त्यांच्या भिन्न समस्या याचा अभ्यास करतो. तसेच प्राकृतिक भूगोल, खगोलशास्त्र, प्रादेशिक, प्रात्यक्षिक व निरीक्षणात्मक भूगोल असे विभाग करण्यात आलेले आहेत. क्रमानुसार जिल्हा, राज्य, देश, जग यानुसार विद्यार्थी शिकत असतो. भूगोल हा केवळ शालेय इमारतीत शिकविला जाणारा विषय नाही. वर्गाबाहेरही त्याचे अध्ययन होऊ शकते. त्यामुळे भूगोल जास्त चिकित्सक, निरीक्षणक्षम बनतो. नैसर्गिक विभागातील मानवाने आपल्या समस्या कशा सोडविल्या आहेत याच्या अभ्यासाने आपल्याही परिसरातील समस्यांचा विचार करून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. प्राकृतिक भूगोलाच्या अभ्यासाने भौगोलिक घटनासंबंधी अचूक अंदाज करता येतो. शेतीतील पिके, उद्योगधंदे, आयात-निर्यात, व्यापार यांचाही योग्य अंदाज बांधता येतो. भूगोलाच्या अध्ययनाने विद्यार्थी कृतिशील राहतो,

इतर कोणत्याही विषयापेक्षा भूगोल विषय मानवाचे सर्व जीवन व्यापून टाकतो. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत मानवाच्या प्रत्येक क्रियेशी कोणत्या ना कोणत्या भौगोलिक घटनांचा संबंध येतोच. असा हा भूगोल विषय महत्त्वाचा व व्यापक असा विषय आहे.

**१.४ समस्या विधान**

***'माध्यमिक स्तरावरील भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकात अंतर्भूत असणाऱ्या गाभाभूत घटकांचा चिकित्सक अभ्यास.'***

**१.५ पारिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या**

**१. माध्यमिक स्तर**

माध्यमिक स्तर या संज्ञेमध्ये इ. ९ वी व १० वी या वर्गांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनापुरता माध्यमिक स्तर म्हणजे इ. ९ वी चा वर्ग एवढ्या पुरताच मर्यादित आहे.

**२. भूगोल**

माध्यमिक स्तरावर शिकविल्या जाणाऱ्या विषयांपैकी इ. ९ वी च्या अभ्यासक्रमातील एक विषय.

**३. पाठ्यपुस्तक**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी मराठी माध्यमांच्या शाळांसाठी इ. ९ वी भूगोल विषयासाठी तयार केलेले क्रमिक पुस्तक.

**४. गाभाभूत घटक**

राष्ट्राची एकात्मता जोपासण्यासाठी सर्व राज्यांच्या प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात ज्याचा समावेश करायला हवा असे सर्वसमान्य घटक म्हणजे गाभाभूत

घटक होय. या संशोधनापुरते दहा गाभाभूत घटक संशोधनाच्या पार्श्वभूमीमध्ये दिल्याप्रमाणे.

५. **चिकित्सक अभ्यास**

सूक्ष्म व काळजीपूर्वक केलेल्या सर्वेक्षणाद्वारे मिळविलेल्या माहितीचे सुयोग्य पृथःकरणाने निष्कर्ष प्रस्थापित करणे म्हणजे चिकित्सक अभ्यास होय.

## १.६ संशोधनाची उद्दिष्टे

संशोधकाने पुढील उद्दिष्टे विचारात घेवून संशोधनकार्य हाती घेतले होते.

१. इयत्ता नववीच्या भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकातील आशयातील गाभाभूत घटकांचा शोध घेणे.

२. इयत्ता नववीच्या भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकात स्वाध्यायात दिलेले उपक्रम व गाभाभूत घटक यांचा संबंध तपासणे.

३. इयत्ता नववीच्या भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकातील आंशयासाठी गाभाघटकानुसार अपेक्षित उपक्रम सुचविणे.

४. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाला गाभाभूत घटकासंदर्भात शिफारशी सुचविणे.

## १.७ संशोधनाची गरज

गाभाभूत घटक ही संकल्पना विविधतेतील एकता जपण्याच्या गरजेतून आली. देशातील प्रत्येक राज्य आपल्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची रूपरेषा ठरवित असते. गाभाभूत घटकांकडे दृष्टीक्षेप टाकला, की हे लक्षात येते की प्रत्येक विषयात गाभाभूत घटकांचा समावेश करण्यात आलेला आहेत.

शैक्षणिक वर्ष २००५-२००६ मध्ये इयत्ता नववीचा पाठ्यक्रम बदललेला आहे. नवीन पाठ्याक्रमाला अनुसरून नवीन पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी तयार केलेले नववीच्या भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकातील आशयात अंतर्भूत असणाऱ्या गाभाभूत घटकांचा अभ्यास करण्यासाठी विविध उपक्रम कोणते हे समजण्यासाठी संशोधनाची गरज आहे.

## १.८ संशोधनाचे महत्त्व

प्रस्तुत संशोधनावरून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी तयार केलेल्या इयत्ता नववीच्या भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकातील आशयामध्ये कोणकोणत्या गाभाभूत घटकांचा समावेश झाला आहे हे समजेल, तसेच उद्दिष्टांची पूर्तता झाली की नाही हे लक्षात येईल. त्याचप्रमाणे विषयाचा दर्जेदारपणा, मूल्यमापनातील त्रुटी समजतील. याचा उपयोग विद्यार्थी व शिक्षक या दोहोंनाही महत्त्वाचा ठरेल.

भूगोल विषयाच्या आशयात ज्या-ज्या ठिकाणी गाभाभूत घटकांचा आशय येईल, त्या-त्या ठिकाणी गाभाघटकांचे स्पष्टीकरण, महत्त्व, उपक्रम समजावून दिल्यास त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना व शिक्षकांना भावी जीवनातही होईल. म्हणजेच ते त्यानुसार वागून आपले जीवन सुखीसमाधानी करतील व त्यामध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता ही मूल्ये आपोआपच रूजतील. त्याचा समाजाला व पर्यायाने राष्ट्रालाही उपयोग होईल. त्याचबरोबर शिक्षक, विद्यार्थी, विषयतज्ज्ञ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांना बदललेल्या इयत्ता नववीच्या भूगोल विषयाच्या पाठ्यक्रमानुसार पाठ्यपुस्तकातील गाभाभूत घटकांच्या अभ्यासासाठी सदरचे संशोधन महत्त्वाचे आहे.

## १.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

हे संशोधन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी मराठी माध्यमांच्या शाळासाठी, इयत्ता नववी भूगोल विषयासाठी जे पाठ्यपुस्तक तयार केलेले आहे ते ज्या-ज्या शाळांमध्ये शिकविले जाते त्या शाळांमध्ये पाठ्यपुस्तकासंदर्भात आलेले निष्कर्ष उपयोगी आहेत.

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी तयार केलेल्या इयत्ता नववीच्या भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकामध्ये अंतर्भूत असणारे गाभाभूत घटक यापुरतेच मर्यादित आहे. आलेले निष्कर्ष हे इयत्ता नववीच्या पाठ्यपुस्तकापुरतेच मर्यादित आहेत.

## १.१० संशोधनाची कार्यपद्धती

सदरचे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडित असल्यामुळे संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे. संशोधनासाठी नमुना निवड, संशोधनासाठी वापरण्यात येणारी साधने याची सखोल माहिती प्रकरण तीन संशोधन कार्यपद्धती यामध्ये देण्यात आलेली आहे.

## १.११ प्रकरणीकरण

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. संशोधनासाठी प्रश्नावली व मुलाखतीद्वारे अभ्यासकाने माहिती मिळविली. नंतर मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून संशोधकाने निष्कर्ष काढून शिफारशी केल्या आहेत. ही सर्व माहिती प्रकरणात खालीलप्रमाणे सादर केली आहे.

### प्रकरण १ - संशोधनाची पार्श्वभूमी

या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी, राष्ट्रीय अभ्यासक्रमातील दहा गाभाभूत घटक, शालेय स्तरावर भूगोल विषयाचे स्थान, भूगोल विषयाचे महत्त्व, समस्या विधान, पारिभाषिक शब्दांच्या

कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, गरज, महत्त्व, व्याप्ती, मर्यादा, कार्यपद्धती व प्रकरणीकरणाचा समावेश केलेला आहे.

**प्रकरण २ - संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा**

या प्रकरणात संशोधन साहित्याच्या आढाव्याचे महत्त्व, संबंधित साहित्याचा अभ्यास, संबंधित संशोधनाचा अभ्यास याविषयी माहिती दिलेली आहे.

**प्रकरण ३ - संशोधनाची कार्यपद्धती**

या प्रकरणात संशोधनासाठी वापरलेली संशोधन पद्धती, नमुना निवड, संशोधनासाठी वापरण्यात आलेली साधने आणि संशोधन कार्यपद्धती यांची माहिती दिली आहे.

**प्रकरण ४ - संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

या प्रकरणात संकलित केलेल्या माहितीमध्ये शिक्षकांच्या वैयक्तिक माहितीचे विश्लेषण, आशयातील गाभाभूत घटकानुसार उपक्रमाचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आलेले आहे.

**प्रकरण ५ - सारांश, निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणात संशोधनाचा सारांश देऊन संकलित माहितीच्या विश्लेषण व अर्थनिर्वचनावरून निष्कर्ष काढलेले आहेत व शिफारशी सुचविण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर पुढील संशोधनासाठी विषय देण्यात आलेले आहेत.